**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीतल्या धक्क्यामुळं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कबुली

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतल्या हिंसाचारावर काँग्रेसकडून चिंता व्यक्त

- अंबरनाथमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सत्ता स्थापनेसाठी भाजपाऐवजी शिवसेनेच्या साथीला, परळीत शिवसेना आणि MIM एकत्र

- देशातल्या शेअर बाजारात सलग पाचव्या दिवशी घसरण, सोनं आणि चांदी मात्र तेजी

**आणि**

- दशावतारसह एकूण ४ चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र, कांतारासह ५ चित्रपट उत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसलेल्या धक्क्यामुळे राज्यातल्या महायुती सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणायचा निर्णय घेतला, अशी कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. सगळ्यांनाच निवडून यायचं असतं आणि अशा योजना लोकमत मिळवण्यासाठी आणल्या जातात. मध्य प्रदेशात अशाच प्रकारची योजना राबवणारे तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडून मार्गदर्शन घेतल्याचंही पवार यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

**<><><><><><>**

भिवंडीला आधुनिक, स्वच्छ, सुरक्षित आणि रोजगाराभिमुख करू असं आश्वासन भाजपाने आज प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात दिलं आहे. सिमेंट काँक्रिटीकरण करणं, शहर वाहतुक सेवेत २०० इलेक्ट्रिक बसची भर, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी अशी आश्वासनं भाजपाने दिली.

**<><><><><><>**

वसई-विरारमधला पाणी साचण्याचा प्रश्न येत्या काळात सोडवू, सात ठिकाणी उड्डाणपूल बांधू, उत्तन ते विरार सागरी महामार्ग तयार करू अशी आश्वासनं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज प्रचारसभेत दिली.

**<><><><><><>**

सांगली-मिरज आणि कुपवाड शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा राष्ट्रवादी काँग्रेसने तयार केला आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज प्रचारसभेत सांगितलं. कवलापूर विमानतळ, बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या विकासासाठी विशेष निधी, इत्यादी आश्वासनं त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><><>**

महानगरपालिकेची सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हाती दिली, तर परभणीचा सर्वांगिण विकास करू, असं आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज परभणी इथं दिलं. ते महानगरपालिका निवणूकीच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या जाहीर सभेत बोलत होते.

**<><><><><><>**

धुळे महानगरपालिकेतल्या प्रभाग क्रमांक ११ मधे धुळे शहराबाहेरचे मतदार असल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली असून त्यांची नावं वगळण्याची मागणी केली आहे.

**<><><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीतल्या १७ ए प्रभागातल्या निवडणुकीवरची काल दिलेली स्थगिती मुंबई उच्च न्यायालयानं आज उठवली. या प्रभागातल्या भाजपा उमेदवाराचा अर्ज, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध बांधकामाच्या मुद्द्यावरुन बाद केला होता. याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत उमेदवाराचा अर्ज स्वीकारून त्याला निवडणूक लढवू देण्याचे आदेश न्यायालयानं दिले. या प्रभागात पूर्वनिर्धारित वेळापत्रकानुसार मतदान होईल, त्यासाठी या उमेदवाराच्या नावासह नव्यानं मतपत्रिका छापाव्यात, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><><><>

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईमधे वाशी इथं एका कारमधून नेली जाणारी १६ लाख १६ हजार रुपयांची रोख रक्कम आज जप्त करण्यात आली.

<><><><><><>

मुंबई महानगरपालिकेसाठी दाखल केलेले उमेदवारी अर्ज निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाराचा गैरवापर करत मोठ्या प्रमाणात बाद केल्याचा आरोप करणारी याचिका आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. याचिकाकर्ता हा उमेदवार नाही, या प्रकरणाशी त्याचा काही संबंध नाही, या मुद्द्यावर न्यायालयानं ही याचिका फेटाळली.

<><><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी पालिकेनं आजपासून मतदार माहिती चिठ्ठयांच्या वितरणाला सुरुवात केली. पात्र मतदाराचं नाव, पत्ता, मतदार यादीतला भाग क्रमांक, मतदान केंद्राचं नाव आणि खोली क्रमांकाची माहिती असलेल्या या चिठ्ठ्या मुंबईतल्या एक कोटीहून अधिक मतदारांच्या घरी पोचवल्या जाणार आहेत.

<><><><><><>

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांना धमकावण्यासाठी खुलेआम बंदुका, कोयते वापरले जात आहेत. यातून अकोट, सोलापूर आणि खोपोलीत तीन खून झाले आहेत. हे लोकशाहीसाठी घातक असल्याची चिंता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली आहे. अहिल्यानगरमध्ये वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. विरोधी पक्षांना हेलिकॉप्टर मिळू नये, प्रचार सभेसाठी मैदाने मिळू नयेत यासाठी ती अडवली जात आहेत, असा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यात सत्ता स्थापनेसाठी विविध प्रकारची समीकरणं आखली जात आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट (१ मिनिट)**

*(अंबरनाथ नगरपालिकेतल्या सत्ता स्थापनेसाठी आता शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि एक अपक्ष नगरसेवक एकत्र आले आहे. या सर्व ३२ जणांनी मिळून सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. या ६० सदस्यीय नगरपालिकेत सर्वाधिक २७ जागा शिवसेनेकडे आहेत. भाजपाचे १४, काँग्रेसचे १२, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ आणि २ अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत. या पालिकेच्या नगराध्यक्षपदी भाजपा उमेदवार विजयी झाले आहेत. दोन दिवसांपूर्वीच भाजपानं काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांना सोबत घेऊन अंबरनाथ विकास आघाडी स्थापन करुन सत्ता स्थापनेची तयारी केली होती. या आघाडीतल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी आता शिवसेनेची साथ धरली आहे.*

*परळी नगरपालिकेत सत्ता स्थापनेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि MIM हे पक्ष एकत्र आल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. मात्र शिवसेना नेते संजय शिरसाठ यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे. शिवसेनाच MIM ला हद्दपार करेल. त्यामुळं त्यांनी अधिक माहिती घ्यावी, असा सल्ला शिरसाठ यांनी दानवे यांना दिला.)*

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजार सुरू असलेली घसरण आज सलग पाचव्या दिवशी कायम होती. दिवसअखेर सेन्सेक्स ६०५ अंकांनी घसरुन ८३ हजार ५७६ अंकांवर बंद झाला. निफ्टी १९५ अंकांची घट नोंदवून २५ हजार ६८३ अंकांवर

स्थिरावला. या आठवड्यात सेन्सेक्स सुमारे २ हजार २०० आणि निफ्टी साडे ५०० अंकांनी घसरला आहे. अमेरिकेकडून संभाव्य करवाढीची भीती, जागतिक पातळीवरील राजकीय अस्थिरता यामुळं बाजारात ही घसरण दिसून येते आहे.

दरम्यान, सोनं आणि चांदीच्या दरात आज पुन्हा तेजी दिसून आली. मुंबईच्या सराफा बाजारात सुमारे ७ हजार रुपयांनी महाग झाल्यानं १ किलो चांदीसाठी करांसह अडीच लाख रुपये मोजावे लागत होते. सोनं आज तोळ्यामागे सुमारे तेराशे रुपयांनी महागलं. त्यामुळं एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४१ हजार रुपये तर १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३७ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम मोजावी लागत होती.

<><><><><><>

कांतारा - द लिजंड चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टूरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे ५ भारतीय चित्रपट ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चर्सने आज ही घोषणा केली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे ४ चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. एकंदर ३१७ चित्रपट ९८व्या ऑस्कर पुरस्करांसाठी पात्र ठरले आहेत. त्यातल्या २०१ चित्रपटांकडे उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठीची अतिरिक्त पात्रता असल्याचं अकादमीनं जाहीर केलं. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारी जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड या चित्रपटाचं नामांकन करण्यात आलं आहे.

<><><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा तपास करण्यासाठी गठित केलेल्या निवृत्त न्यायाधीश एम. एल. ताहलियानी यांच्या एकसदस्यीय समितीच्या अहवालाची छाननी करण्यासाठी आणि त्यांनी सुचवलेल्या

उपाययोजनावर शासनाने करायच्या कार्यवाहीचा मसुदा तयार करण्यासाठी छाननी समिती आज स्थापन करण्यात आली. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करेल.

<><><><><><>

आज प्रवासी भारतीय दिवस. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या विनंतीवरून महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेहून भारतात परत आले आणि मुंबईत उतरले, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस प्रवासी भारतीय दिवस म्हणून साजरा केला जातो. जाणून घेऊ या या ऐतिहासिक घटनेमागची कहाणी, मुंबईच्या इतिहासाचे अभ्यासक भरत गोठोसकर यांच्याकडून...

***होल्ड... बाईट- भरत गोठोसकर***

<><><><><><>

विकसित भारत जी राम जी कायद्यातल्या तरतुदी गावाचा शाश्वत विकास साधण्यात मैलाचा दगड ठरतील, असं मत रत्नागिरी जिल्ह्यातले शेतकरी शांताराम खापरे यांनी आकाशवाणीकडे व्यक्त केलं.

**होल्ड बाईट ( २३ सेकंद)**

//<><><><><><>//